## आजचा शुभ विचार

“"बुद्धिमत्तेचा विकास हे मानवी अस्तित्वाचे अंतिम लक्ष्य असले पाहिजे"आपण नेहमी काहीतरी शिकत राहिले पाहिजे. आपले ज्ञान वाढविण्यावर भर दिला पाहिजे"

डॉ. बाबासाहेब आंबेडकर

RNI NO. - MAHMAR/2023/87923

SWARAJYADOOT

# स्वराज्यदूत

www.swarajyadoot.com पहारेकरी सत्याचा.. कैवारी बहुजनांचा..!








मुख्य संपादक - श्री. भास्कर जी. देवरे | उपसंपादक - श्री. शांताराम देवरे | कार्यकारी संपादक- श्री. मनोहर देवरे | निवासी संपादक- श्री.संतोष बी.मोहिते

DAILY ▪ MARATHI ▪ YEAR- 3 ▪ ISSUE-28 ▪ Published from NASHIK (MAH) ▪ Friday 30 May 2025 ▪ PAGES 4 ▪ Price - 4 Rs.

दैनिक ▪ मराठी ▪ वर्ष ३ ▪ अंक २८ ▪ नाशिक ( महाराष्ट्र ) येथून प्रकाशित ▪ शुक्रवार, दि. ३० मे २०२५ ▪ पाने ४ ▪ ₹ ४ रुपये


## मुख्यमंत्र्यांच्या घरासमोर आत्मदहनाचा प्रयत्न

ओम सोमवंशी
मुंबई प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

-----------------------




मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या शासकीय निवासस्थानी वर्षा बंगल्याबाहेर आत्मदहनाचा प्रयत्न झाला. या प्रकरणात अंगावर पेट्रोल टाकून घेत असलेल्या अजित रामकृष्ण मैंदरगी या ३९ वर्षाच्या व्यक्तीला पोलिसांनी अटक केली आहे. अजित हा सोलापूर जिल्ह्यातील बलिवेसचा निवासी आहे. पोलिसांनी अजित विरोधात गुन्हा नोंदवला नंतर त्याला कायदेशीर नोटीस देऊन सोडण्यात आले. अजित वर्षा बंगल्यात घुसखोरीचा प्रयत्न करत होता. पोलिसांनी त्याला अडवले, त्यावेळी अजितने खिशातून बाटली काढून अंगावर पेट्रोल ओतून घेतले पण पोलिसांनी त्याला लगेच पकडले. यानंतर त्याची अंगझडती घेण्यात आली. पकडल्यानंतर पोलिसांनी अजितची कसून चौकशी केली. यानंतर पोलिसांनी कायदेशीर नोटीस देऊन अजितला सोडून दिले. अजित प्रकरणात तपास सुरू आहे. अजितच्या कृत्यामागील नेमका हेतू जाणून घेण्याचा प्रयत्न सुरू आहे.

## कशेडी घाटात भेगा, नव्या मुंबई-गोवा महामार्गावर भूस्खलनाचा धोका वाढला

सुनील बाचरे
अंबरनाथ प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

---------------------------



जुन्या मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक १७ वरील कशेडी घाटात भेगा पडल्याने आणि मंगळवारी सायंकाळी खेड तालुक्याच्या हद्दीत भुयारी मार्गावर मोठमोठे दगड कोसळल्याने नव्या महामार्ग क्रमांक ६६ वर भूस्खलनाचा गंभीर धोका निर्माण झाला आहे. कोंढवी फाट्याजवळ जुन्या महामार्गावर भेगा पडलेल्या ठिकाणी संभाव्य धोक्याची सूचना देणाऱ्या पताका लावण्यात आल्या असून, वाहतुकीस प्रतिबंध करण्यात आला आहे. या भेगांमुळे जुना महामार्ग खचून तो थेट नव्या महामार्गावर कोसळण्याची शक्यता आहे. दरम्यान, कातळी भोगावच्या हद्दीत भुयारी मार्ग पूर्ण होताच, रत्नागिरी जिल्ह्यातील खेड हद्दीत चार ते सहा मोठे दगड पडल्याचे मदत ग्रुपचे प्रसाद गांधी यांनी माहिती दिली. या पार्श्वभूमीवर जुना रस्ता तातडीने फोडून संरक्षक उपाययोजना केल्या नाहीत, तर नव्या महामार्गावरील वाहतूक ठप्प होण्याचा धोका आहे. मात्र अद्याप कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नाही, त्यामुळे स्थानिकांमध्ये चिंता व्यक्त केली जात आहे.

## लाडक्या बहिणींसाठी आदिवासी विभागाचा निधी पळवला? विरोधकांच्या आरोपांवर मुख्यमंत्री फडणवीस यांचे स्पष्टीकरण

ओम सोमवंशी
मुंबई प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

--------------------



राज्यातील महायुती सरकारने लाडकी बहीण योजनेसाठी आदिवासी विभागाचा तब्बल ३३५ कोटी रुपयांचा निधी महिला व बालविकास विभागाकडे वळवल्याचा आरोप विरोधी पक्षांकडून होत आहे. याआधी सामाजिक न्याय विभागाचा निधी वळवल्याचा आरोप झाला होता. मंत्री संजय शिरसाट यांनी यावरून जाहीर नाराजी व्यक्त केली होती. तसेच अनुसूचित जातींसाठीचा निधी देखील वळवल्याचा आरोप होत आहे. या सगळ्या आरोपांवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली आहे. फडणवीस म्हणाले, “लाडकी बहीण योजनेसाठी इतर विभागांचा निधी पळवल्याचा आरोप केला जात आहे तो पूर्णपणे खोटा आहे. हा अतिशय चुकीचा दावा आहे. अर्थसंकल्पाची पद्धत ज्यांना समजत नाही ती मंडळी असा आरोप करू शकतात”.

### फडणवीसांनी सांगितला अर्थसंकल्पाचा नियम

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, “ अर्थसंकल्पाबाबतचा नियम असा आहे की आपल्या अर्थसंकल्पात आदिवासी लोकांच्या संख्येप्रमाणे आदिवासींकरिता, अनुसूचित जातींमधील लोकांच्या संख्येप्रमाणे अनुसूचित जातींमधील लोकांकरिता निधी राखून ठेवावा. मात्र, हा निधी राखून ठेवत असताना वैयक्तिक लाभांच्या योजनांना प्राधान्य द्यावं. म्हणजेच जास्तीत जास्त निधी वैयक्तिक लाभांच्या योजनांसाठी राखून ठेवला पाहिजे”. फडणवीस म्हणाले, “लाडकी बहीण योजना ही वैयक्तिक लाभाची योजना आहे. त्यासाठी निधी दिला तर तो अर्थसंकल्पाच्या नियमाप्रमाणे आदिवासी विभागात दाखवावा लागेल. तोच नियम अनुसूचित जाती व सामाजिक न्याय विभागाच्या बाबतीतही लागू होतो. तो निधी त्या-त्या विभागातच दाखवावा लागेल. त्याप्रमाणे आम्ही तो निधी त्या विभागात दाखवला आहे”.

### आदिवासी विभागाचं बजेट वाढवलं : फडणवीस

मुख्यमंत्री म्हणाले, “राज्याचे अर्थमंत्री अजित पवार यांनी विधीमंडळात यावर खुलासा केला आहे. आम्ही नुसते पैसे या विभागात दाखवलेले नाहीत, तर त्या विभागांचं बजेट देखील वाढवलं आहे. नियमाप्रमाणे आम्ही पैसे दाखवले आहेत. हीच अर्थसंकल्पाची अकाउंटिंगची पद्धत आहे. आम्ही कुठल्याही विभागाचा पैसा कुठेही वळवला, पळवला नाही. ज्यांना अर्थसंकल्प समजत नसेल तर त्यांनी माझ्याकडे यावं. अर्थसंकल्प कसा वाचावा यावर मी पुस्तक लिहिलं आहे. मी त्यांना अर्थसंकल्पाच्या अकाउंटिंगची पद्धत समजावून सांगेन”.

### फडणवीसांकडून अजित पवारांची पाठराखण

देवेंद्र फडणवीस म्हणाले, “ नियमाप्रमाणे जी तरतूद आहे ती आम्हाला दाखवावी लागते, जी आम्ही दाखवली आहे. यात कुठलीही बनवाबनवी नाही, फसवाफसवी नाही. मी पुन्हा एकदा स्पष्ट करू इच्छितो की अजित पवार यांनी योग्य काम केलं आहे”.

## “वैष्णवीला पाच ते सहा दिवस मारहाण झाली, ती आता हयात नाही; आता किमान आता तरी तिच्या चारित्र्यावर शिंतोडे उडवू नका”, वडील अनिल कस्पटे यांची समाज माध्यमांना कळकळीची विनंती

अभिजित कुलकर्णी
पुणे प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

----------------------------





पुण्याच्या मुळशी तालुक्यातील वैष्णवी हगवणे आत्महत्या प्रकरणाची राज्यभरात होते आहे. या प्रकरणावर बुधवारी पुणे न्यायालयात सुनावणी झाली. यावेळी न्यायालयाने वैष्णवीचा सासरा राजेंद्र हगवणे, दीर सुशील हगवणे या दोघांना तीन दिवसांची पोलीस कोठडी, तर वैष्णवीचा नवरा शशांक, नणंद करीश्मा व सासू लता या तिघांना एक दिवसाची पोलीस कोठडी सुनावली आहे. दरम्यान हगवणे कुटुंबाच्या वकिलांनी युक्तिवाद करताना वैष्णवीच्या चारित्र्यावर संशय व्यक्त केला. आता वैष्णवीच्या वडिलांनी त्याबाबत उत्तर दिलं आहे.

### हगवणे कुटुंबाच्या वकिलांनी काय सांगितलं?

“वैष्णवीच्या फोनमध्ये आक्षेपार्ह चॅट्स व इतर आक्षेपार्ह गोष्टी सापडल्या होत्या”, असा दावा हगवणे कुटुंबाच्या वकिलांनी प्रसारमाध्यमांसमोर केला आहे. बुधवारी सुनावणी पार पडल्यानंतर त्यांनी माध्यमांना प्रतिक्रिया दिली. यावेळी त्यांनी वैष्णवीवर आरोप केले. तसेच पतीने रागाच्या भरात पत्नीला मारणे हा काही कौटुंबिक हिंसाचार ठरत नाही, असा दावा देखील त्यांनी केला आहे.

### वैष्णवीचे वडील अनिल कस्पटे काय म्हणाले?

वैष्णवीच्या मोबाइल चॅटबाबत मला हगवणे कुटुंबाने कुठलीही माहिती दिलेली नाही. वैष्णवी हयात नाही आणि आता तिच्या चारित्र्यावर संशय घेण्यात आला आहे. मोबाइल मी काढून घेतला वगैरे नाही. मी माझ्या मुलीला मोबाइल दिला आहे तर शशांकला दीड लाखांचा मोबाइल घेऊन दिला कारण त्याने त्या मोबाइलची मागणी केली होती. वाकड येथील क्रोमा या ठिकाणी शशांक आला, माझ्या मुलीला (वैष्णवी) बोलवून घेतलं. तिथे त्याने वैष्णवीकडे मागणी केली की तुझ्या पप्पांना सांग मला मोबाइल हवा आहे. मला वैष्णवीने फोन करुन तिथे बोलवून घेतलं. तो मोबाइल मी शशांकला घेऊन दिला. १८ सप्टेंबर २०२४ ला मोबाइल घेऊन दिला. त्या मोबाइलचे हप्ते आजही मी भरतो आहे. असं वैष्णवीचे वडील अनिल कस्पटे यांनी माध्यमांना सांगितलं.

### माझ्याशी वाद घालून, भांडण करुन हुंडा घेतला आहे-अनिल कस्पटे

“ हुंड्यासाठी छळ केला नाही, गाडी मागितली नाही म्हणता तर मग मी एमजी हॅक्टर गाडी बुक केली होती. ती मी रद्द केली कारण त्यांनी वाद घालून फॉर्च्युनर मागून घेतली. बैठकीत वादावादी झाली होती फॉर्च्युनरच हवी असा हट्ट धरला होता. त्यांच्याकडे ही एकच कार आहे. जी काही ९० लाखांची गाडी आहे सांगत आहेत ती चंद्रकांत हुचडे नावाने आहे. हगवणे कुटुंबाकडे कुठलीही गाडी नाही. माझ्याकडे कार मागितली, लग्नाला उभं राहणार नाही, लग्नातून निघून जाईन अशा धमक्या देऊन माझ्याकडून सगळा हुंडा घेतला आहे. अधिक महिन्यात जावयाला चांदीचं ताटच पाहिजे असाही हट्ट धरला होता तो पण मी पूर्ण केला.” असंही अनिल कस्पटे म्हणाले.

### वैष्णवीच्या मृत्यूपूर्वी तिला पाच ते सहा दिवस मारहाण झाली

वैष्णवीला पाच ते सहा दिवस मारहाण सुरु होती. वैष्णवी १० मे रोजी जेव्हा इथे आली होती तेव्हा तिने आईलाही ही बाब सांगितली होती की तिला मारहाण केली जाते आहे. तिचा छळ होत होता. त्यानंतर ११ मे रोजी तिला फोन आला त्यामुळे तिला जावं लागलं. माझ्या मुलीवर ते काहीही शिंतोडे उडवतील. वकिलांना मी इतकंच सांगेन की तुम्ही सूज्ञ आहात. माझी मुलगी तर गेली आता माझ्या मुलीवर अशा प्रकारे शिंतोडे उडवू नका. माझी एवढीच त्यांना विनंती आहे, असं अनिल कस्पटे यांनी म्हटलं आहे.

## “ऑपरेशन सिंदूर अजून संपलेलं नाही”

## पंतप्रधान मोदींचा पाकिस्तानला इशारा

विशेष वृत्त सेवा
दैनिक स्वराज्यदूत

-------------------------



पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तान व पाकव्याप्त जम्मू आणि काश्मीरमधील दहशतवादी तळांवर ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून हवाई हल्ले केले होते. यामध्ये भारतीय लष्कराने दहशतवाद्यांची तब्बल नऊ तळ उद्ध्वस्त केले होते. यानंतर पाकिस्तानने सीमेलगतच्या भारतीय शहरांवर हल्ले करण्याचे अयशस्वी प्रयत्न केले होते. जे भारतीय लष्कराने परतावून लावले होते. इतकेच नव्हे तर भारतीय लष्कराने पाकिस्तानच्या हवाई तळांचेही मोठे नुकसान केले होते. दरम्यान, पश्चिम बंगालमध्ये एका सभेत बोलताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पाकिस्तानला इशारा देत, ऑपरेशन सिंदूर अद्याप संपले नसल्याचे म्हटले आहे.

### दहशतवाद आणि नरसंहार ही पाकिस्तानी सैन्याची कौशल्ये

यावेळी बोलताना पंतप्रधान मोदी म्हणाले की, “ पाकिस्तान जेव्हापासून अस्तित्वात आले आहे, तेव्हापासून त्यांनी फक्त दहशतवादालाच पोसले आहे. दहशतवाद आणि नरसंहार ही पाकिस्तानी सैन्याची सर्वात मोठी कौशल्ये आहेत. जेव्हा थेट युद्ध केले जाते तेव्हा त्यांचा पराभव निश्चित असतो. यामुळेच पाकिस्तानी सैन्य दहशतवाद्यांची मदत घेते. पाकिस्तानने हे समजून घेतले पाहिजे की, तीन वेळा घरात घुसून मारले आहे. बंगाल टायगरच्या भूमीतून १४० कोटी भारतीयांची घोषणा आहे की, ऑपरेशन सिंदूर अजून संपलेले नाही.”

### पाकिस्तानने कल्पनाही केली नव्हती

या सभेत पुढे बोलताना पंतप्रधान मोदी म्हणाले की, “ २२ एप्रिल रोजी पहलगाममध्ये दहशतवाद्यांनी केलेल्या क्रूरतेनंतर पश्चिम बंगालमध्ये खूप संताप होता. तुमचा राग आणि संताप मला चांगल्या प्रकारे समजला होता. दहशतवाद्यांनी आपल्या बहिणींचे सिंदूर पुसण्याचे धाडस केल्याने, आपल्या सैन्याने त्यांना सिंदूरची ताकद दाखवून दिली. आम्ही दहशतवादाचे असे अड्डे नष्ट केले, ज्याची पाकिस्तानने कल्पनाही केली नव्हती.”

### पाकिस्तानकडे काहीही सकारात्मक नाही

“ दहशतवादाला पोसणाऱ्या पाकिस्तानकडे जगाला देण्यासाठी काहीही सकारात्मक नाही. जेव्हापासून ते अस्तित्वात आले तेव्हापासून त्यांनी फक्त दहशतवादाला पोसले आहे. १९४७ मध्ये फाळणी झाल्यापासून त्यांनी भारतावर दहशतवादी हल्ले केले आहेत. काही वर्षांनी, आजच्या बांगलादेश या शेजारील देशात त्यांनी दहशत माजवली होती. पाकिस्तानी सैन्याने बांगलादेशात बलात्कार आणि खून कसे केले हे कोणीही विसरू शकत नाही” , अशा शब्दांत पंतप्रधान मोदींनी पाकिस्तानला फटकारले.

संपादकीय

# कोकणात मिरगा आधीच व्हाळ भरलो...!

हाराष्ट्रातील शेतकरी बेसावध असतानाच पाऊस सुरू झाला. सुरुवातीला अवकाळी पाऊस आहे, तो लगेच जाणार अशाच चर्चा केल्या जात होत्या. वळवाचा पाऊस आहे, असं वाटत असताना १०-११ मेपासून पावसाने हजेरी लावली आणि संततधार सुरूच ठेवली. तो आता थांबेल... आता थांबेल असे वाटत असताना मान्सून दाखल झाला आणि कोकणवासीयांची सर्व गणितेच बिघडून गेली. पावसाळी हंगामाची कामं आरामात करून दरवर्षी घरातील जळणासाठी लागणारा लाकुडफाटा गोळा करत त्याची साठवण केली जाते; परंतु यातलं काहीच करायला मिळाल नाही. उन्हाळ्यात पापड, लोणची, सांडगे असे एक ना अनेक जेवणातील पदार्थ मे अखेरपर्यंत तयार केले जातात. वर्षभराची 'बेगमी' कोकणवासीय करतो. यावेळी त्यातलं काहीच करता आलं नाही. पाऊस पडला की जांभुळ, करवंदांचा रानमेवा खाता येत नाही. यावर्षी करवंद जाळीवरच राहिली. मनसोक्त करवंदांचा आस्वाद घेता आला नाही. असे संवाद चाकरमान्यांमध्ये ऐकायला मिळत आहेत. आंब्याचं पीक कमी होतं. त्यात या पावसाचे आगमन, नंतर आलेला आंब्याचा बहरही आंबाबागेतच राहिला. कोकणातील कलिंगड लागवड करणारा शेतकरीही पूर्णपणे अडचणीत आला. त्याचे लाखो रुपयाचं नुकसान झालं आहे. बागेतली कलिंगडं बागेतच सोडून द्यावी लागली. मे महिन्याचे वीस दिवस आणि जून महिन्याचा पहिला आठवडा यामध्ये कलिंगडला चांगला दर येणार होता. ती सर्व कलिंगडं बागेतच सोडून देण्याची वेळ आली. मात्र कलिंगड बागायतदार शेतकरी नुकसान होऊनही डोक्याला हात लावून न बसता पुढील वर्षी चांगला हंगाम येईल या अपेक्षेत आहे. कोकणात अवकाळी पाऊस पडतो; परंतु तो दोन-चार दिवसांपुरता पाहुणा असतो. कोकणातील पावसाची खरी सुरुवात ही मृगनक्षत्राला होते. ७ जूनला पाऊस सुरू होतो. त्यामुळे शेतीची कामे, त्याची आवराआवर शेतकरी मे अखेरपर्यंत करत असतो. शेतकऱ्यांचे सर्व अंदाज यावेळी निसर्गाने चुकवले. शेतीच्या व्यवस्थापनात पावसाच्या एंट्रीने जसं बिघडवलं तसंच वीज वितरण, टेलिफोन या विभागांच्या पावसाळ्यापूर्वी झाडांमधून गेलेल्या लाईनक्लिअर करून घेण्याची कामही होऊ शकलेली नाहीत. ७ जूनला पावसाची सुरुवात होते. पुढचे चार-पाच महिने कोकणात संततधार कोसळत असतो. पावसाच्या या वर्षीच्या या अचानक येण्याने कोकणातील भात पेरणी करण्यापूर्वीच नुकसान झाले. भातशेतीतली भाजावळ, जमिनीची मशागत शेतकऱ्यांना करता आली नाही. यातही मशागत करण्यात आली असली तरीही मेच्या सुरुवातीलाच मुसळधार पाऊस सुरू झाल्याने शेतात पाणी असल्याने नांगरणी आणि पेरणी कशी करायची? या अशा विचित्र स्थितीत कोकणातील शेतकरी संभ्रमावस्थेत गेला. कृषी विभागाकडून शेतकऱ्यांना या पावसात भात पेरणी करायची की नाही याच्या कोणत्याही सूचना आल्या नाहीत. अर्थात कृषी विभागालाही पावसाने संभ्रमित केले. या सर्वांचा परिणाम म्हणजे कोकणातील शेतकरी भातपेरणी करू शकला नाही. भात पेरणी, लावणीनंतर भातपीक तयार होण्याचा कालावधी किमान १२० ते १४० दिवसांचा कालावधी असतो. कोकणात एकतर भातशेती करणाऱ्यांची संख्या कमीच आहे. त्यात या अचानक सुरू झालेल्या पावसाने सर्वच शेतीची कामे जागच्या-जागी राहिली आहेत. कोकणात मृग नक्षत्रानंतर पाऊस सुरू झाला की कोकणातील नदी, नाले, गावातील वाडी-वस्तीतील ओहोळ तुडुंब भरून वाहतात. मत्स्यप्रेमी चढणीचे मासे पकडण्यासाठी जातात. चढणीचे मासे पकडून त्याची मच्छिकरी बनवणं आणि तांदळाची भाकरी आणि भात यासोबत मनसोक्त आनंद घेत त्याचा आस्वाद घ्यायचा. मासे कुठल्या ओहोळात काट्यातून उतरून पकडले याच्या सुरस गंमतीदार चर्चा कोकणातील चहा-भजीच्या टपरीवर ऐकायला मिळतात. चढणीचे मासे पकडण्याचे हे मत्स्यपुराण ऐकण्यात कोकणातील अनेक पिढ्या गेल्या.

पूर्वीचा शेतीच्या हंगामात पावसाळी हंगामातील खान-पान एकदम भारी असायचे. पिठी भात आणि सोबत सुका बांगडा ही तर मेजवानीच. आजवर मान्सून पहिला केरळमध्ये दाखल व्हायचा आणि नंतर महाराष्ट्रात, कोकणात यायचा; परंतु यावर्षी उलटच घडले. पहिल्यांदा पाऊस कोकणात आला आणि आता केरळमध्ये दाखल होतोय. यावर्षीच्या पावसाने सर्वांचे अंदाज चुकवले. एकिकडे जशी शेतकऱ्यांची पेरणीपासून अनेक काम राहिली. ऐन मे महिन्यातच पाऊस सुरू झाल्याने कौलांच्या घरांच्या छपरांची यावर्षी साफसफाई करता न आल्याने कोकणातील अनेक घरांवर मेनकापड दिसले. कोकणातले कोकम. पुढची प्रक्रिया होऊ न शकल्याने साहजिकच कोकणातून यावर्षी कोकमच गायब होईल की काय अशी स्थिती निर्माण झाली आहे. मे महिन्यात आलेल्या पावसाने कोकणचं सारंच बिघडवलंय. या पावसाळीविषयी त्रिंबकचे बाबू घाडीगांवकर यांनी मीरगाआधीच व्हाळ भरलो या कवितेत छान वर्णन केलेय... अन् मालवणी माणसाची व्यथाही मांडलीय...

**ते म्हणतात,**

**गीम जसो तापाक लागलो**
**घामान जीव जाव्क लागलो**
**मधीच असो पाव्स पडलो**
**मीरगाआधीच व्हाळ भरलो**
**लग्ना आजून बाकी तरी**
**मांडव पुरो भीजान गेलो**
**पाव्स असो वत वत वतलो**
**मीरगाआधीच व्हाळ भरलो**
**कुणगे आता झाडू कसे?**
**तसोच तरवो पेरूचो इलो**
**बेळी थोडी कुडीन तवसर**
**मीरगाआधीच व्हाळ भरलो**
**ओसाड माळ हिरवो झालो**
**टायकुळो रुजान वर इलो**
**आंब्यांखाली चिखल झालो**
**मीरगाआधीच व्हाळ भरलो**
**तळयेचो पाट मोकळो झालो**
**पोखर आताच वताक लागलो**
**व्हाळयेत बांडूक डरवाक लागलो**
**मीरगाआधीच व्हाळ भरलो**
**कुरलें चढले मासो चढलो**
**बंगो रटमाट करूक लागलो**
**भाटी मळो भरान गेलो**
**मीरगाआधीच व्हाळ भरलो**
**सगळो कोकण हिरवो झालो**
**कोकणचो कॅलिफोर्निया झालो**
**गरमी उकाडो नायसो झालो**
**मीरगाआधीच व्हाळ भरलो!**

# भूमीशी एकरूप झालेला कर्मयोगी पद्मश्री चैत्राम पवार जळगाव बस स्थानकावरील एका निस्पृह क्षणाने हेलावले मन

विनोद मोरे
साक्री शहर प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत



जळगाव बस स्थानकावर एक हृद्य स्पर्शी दृश्य अनेकांच्या डोळ्यांना भिडले. डोक्यावर ओझ्याचे गाठोडे घेऊन चाललेला एक साधासुधा माणूस, ज्याला अनेकांनी कदाचित ओळखलेही नसेल, तो दुसरा तिसरा कोणी नसून पद्मश्री चैत्रामजी पवार होते. कर्मयोगी ही उपाधी ज्याच्यासाठी अक्षरश जन्माला आली आहे, असे हे चैत्राम भाऊ पवार त्यांना प्रसिद्धीची, कौतुकाची, किंवा पुरस्काराची कधीही ओढ नव्हती, त्यांच्यासाठी त्यांचे निस्पृह कार्य हेच त्यांचे जीवन आणि त्यांची ओळख आहे. काल परवा जळगावच्या बस स्थानकावर टिपलेला त्यांचा हा भावनिक फोटो, त्यांची निष्ठावान वृत्ती आणि मातीशी असलेली त्यांची अतूट नाळ पुन्हा एकदा जगासमोर आणतो. हा क्षण केवळ एक चित्र नसून एक प्रेरणादायी गाथा आहे.

मातीशी जोडलेली नाळ, बारीपाडा ते पद्मश्री चा प्रवास धुळे जिल्ह्यातील साक्री तालुक्यात, आदिवासीबहुल भागात बसलेले बारीपाडा हे चैत्राम भाऊच्या अथक परिश्रमामुळे आज एक आदर्श गाव बनले आहे. ज्या ठिकाणी विकासाची कल्पना करणे ही कठीण होते, त्या दुर्गम भागाचा त्यांनी अक्षरशः कायापालट केला आहे. विकसित ग्रामीण भारताचे स्वप्न त्यांनी नुसते पाहिले नाही, तर ते प्रत्यक्षात आणण्यासाठी त्यांनी आपले जीवन समर्पित केले. जल जंगल जमीन आणि मानव यांच्यातील नाजूक समतोल किती महत्वाचा आहे, हे त्यांनी गेल्या अनेक वर्षापासून आपल्या कृतीतून सिद्ध केले आहे. त्यांनी घेतलेले कष्ट, त्यांचे समर्पण आणि त्यांची दूरदृष्टी यामुळेच बारीपाडा आज पर्यावरणाचा आणि ग्रामीण विकासाचा एक जागतिक नमुना बनला आहे. शासनाने अशा खऱ्या कर्मयोद्धाची दखल घेऊन त्यांना पद्मश्री पुरस्काराने सन्मानित केले, हा केवळ चैत्रामभाऊचा नव्हे, तर त्या पुरस्काराचाच खरा गौरव आहे, कारण तो एका निस्वार्थ कार्याला दिलेला आदरांजली आहे.

**भाऊ, हे केवळ एक नाव नाही, ती एक भावना आहे.**

चैत्राम भाऊ पवार यांना स्थानिक लोक मोठ्या आदाराने भाऊ म्हणूनच हाक मारतात. लहाना पासून तर मोठ्या पर्यंत आदिवासी पाड्या पासून ते आंतरराष्ट्रीय स्तरावर सर्वजण त्यांना भाऊ म्हणूनच ओळखतात. हे नाव केवळ एक संबोधन नाही, तर ते प्रेम आदर आणि विश्वासाचे प्रतीक आहे त्यांचे शिक्षण एम. कॉम पर्यंत झाले असले तरी, ते आजही साधी शर्ट पायजमा आणि पायात साधी चप्पल घालून आपल्या बोलीभाषेत सर्वांना मार्गदर्शन करतात. त्यांची ही साधी राहणी, पण त्यांचे कार्य मात्र देश विदेशात पोहोचले आहे. आजही बरीपाडा गावात देश विदेशातून शेकडो विद्यार्थी पीएचडी आणि पर्यावरणावर अभ्यास करण्यासाठी येतात, हि त्यांच्या कार्याचीच सर्वात मोठी पोचपावती आहे. त्यांचे प्रत्येक शब्द प्रत्येक कृती, ही त्यांच्या अनुभव आणि ज्ञानाने भरलेली असते.

**बारीपाडा एक गाव नाही, एक चळवळ, एक आदर्श.**

बारीपाडा हे आता केवळ एक गाव राहिले नसून, ती एक चळवळ बनली आहे, एक आदर्श बनला आहे. या गावाला राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तराव वरील अनेक पुरस्कार मिळाले आहेत. येथे स्थानिक महिलांना प्रोत्साहन देण्यासाठी गेल्या अनेक वर्षापासून वन भाजी स्पर्धेचे आयोजन केले जाते, ज्यात एका मोठ्या थाळीत 110 प्रकारच्या वन भाज्याची नोंद केली गेली आहे. हा केवळ एक उपक्रम नाही, तर पर्यावरणाचे आणि स्थानिक संस्कृतीचे महत्त्व जपण्याचा एक अनोखा प्रयत्न आहे. चैत्राम भाऊंनी या मातीतून केवळ झाडे लावली नाहीत, तर हजारो मनामध्ये माणुसकी आणि पर्यावरणाविषयीची बीज पेरली आहेत.

जमिनीशी घट्ट रुजलेले, निस्वार्थ व्यक्तिमत्व,रोज मुलाखती आणि बातम्यांमध्ये व्यस्त असतानाही जळगाव बस स्थानकावर दिसलेले चैत्राम भाऊ चा हा फोटो दर्शवते की हा माणूस आजही आपल्या जमिनीशी, आपल्या मुळाशी किती घट्ट जोडलेला आहे. त्यांना आपले मूळ अस्तित्व आपले साधे पण कधीच विसरले नाही. त्यांना पाहून वाटते की, खऱ्या अर्थाने मोठे असणारे लोक हेच असतात जे प्रसिद्धीच्या झगमगाटातही आपले साधी ओळख जपतात. दूरदृष्टी असलेल्या आणि निस्वार्थी पणे काम करणाऱ्या मोठ्या माणसाची लक्षणे कदाचित हीच असावीत. चैत्राम भाऊ पवार हे समाजासाठी एक चालती बोलती प्रेरणा आहेत, ज्याचे जीवन आणि कार्य आजही अनेकांना मार्ग दाखवत आहे. त्यांचा हा क्षण केवळ एक छायाचित्र नसून, एक शाश्वत सत्य आहे. खरा पद्मश्री तोच असतो जो आपल्या कामातून जमिनीशी एकरूप होऊन समाजाची सेवा करतो.

चैत्रम भाऊ सारख्या निस्वार्थ व्यक्तिमत्त्वाला पाहून तुमच्या मनातकोणती भावना येते.

# जेष्ठ पत्रकार सुभाष जगताप यांना 'इंडियन एक्सलन्स अवॉर्ड २०२५' जाहीर

प्रविण काकुस्ते
पिंपळनेर प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत



पिंपळनेर तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष तथा ज्येष्ठ पत्रकार सुभाष जी जगताप यांना पत्रकारितेतील त्यांच्या उल्लेखनीय योगदानाबद्दल 'इंडियन एक्सलन्स अवॉर्ड २०२५' जाहीर झाला आहे. ग्रामीण पत्रकारितेच्या माध्यमातून सामाजिक भान जपत सातत्याने जनतेच्या प्रश्नांना वाचा फोडणाऱ्या जगताप यांच्या कार्याची दखल राष्ट्रीय स्तरावर घेतली गेली आहे. गेल्या तीन दशकांहून अधिक काळ पत्रकारितेच्या क्षेत्रात कार्यरत असलेल्या सुभाष जी जगताप यांनी आपल्या कार्यकाळात निष्पक्ष, निर्भीड आणि समाजाभिमुख पत्रकारितेचा आदर्श प्रस्थापित केला आहे. पिंपळनेर तालुका पत्रकार संघाच्या माध्यमातून त्यांनी पत्रकारांच्या हक्कांसाठी भक्कम आवाज उठवला असून, संघटनेच्या मजबुतीसाठी त्यांनी दिलेले योगदान लक्षणीय आहे. या पुरस्कारामुळे पिंपळनेर परिसरातील पत्रकारिता क्षेत्रात आनंदाचे वातावरण असून, विविध सामाजिक, शैक्षणिक व पत्रकार संघटनांकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. हा पुरस्कार लवकरच एका विशेष समारंभात प्रदान केला जाणार असून, त्यांच्या पुढील कार्यासाठी सर्व स्तरांतून शुभेच्छा व्यक्त केल्या जात आहेत.

# "वृद्धाश्रमात जायचे नसेल तर, मुलांनवर चांगले संस्कार करणे काळाची गरज" 'व्याख्याते समाधान हेंगडे पाटील' वर्षश्राद्धा निमित्त विचारांचा जागर

शैलेश रौंदळ
नाशिक प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत





"कैलासवासी श्री. निवृत्ती हरिभाऊ बोडके" यांचे तपोवन, नाशिक येथे 'प्रथम पुण्यस्मरण' पार पडले त्या निमित्ताने बोडके कुटुंबाने महाराष्ट्रातील "सुप्रसिद्ध व्याख्याते श्री.समाधान हेंगडे पाटील" यांचे "चला महापुरुषांच्या विचारातून,संस्कारातून आई-वडील समजून घेऊया" या विषयावरील व्याख्यान आजोजित करणे होते.

त्याप्रसंगी "व्याख्याते श्री.समाधान हेंगडे पाटील" म्हणाले की, राजमाता जिजाऊ साहेबांनी छत्रपती शिवाजी महाराजांवर योग्य वेळी योग्य संस्कार केल्यामुळे, छत्रपती शिवाजी महाराजांसारखा 'सर्वश्रेष्ठ राजा' जिजाऊंनी घडवला, याचे एकमेव कारण म्हणजे जिजाऊंनी आपल्या लेकरावर केलेले संस्कार आणि त्या संस्कारातून घडलेलं लेकरू. छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, महात्मा ज्योतिराव फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, राजश्री शाहू महाराज, अशा महापुरुषांवर योग्य वेळी त्यांच्या मातेकडून चांगले 'संस्कार' झाल्याने या युगपुरुषांनी स्वकर्तुत्वातून जगाला प्रेरणा दिली... तसेच संस्कार आज आपल्याही घरातून मुलांवर व्हावेत, आणि असे संस्कार जेव्हा होतील तेव्हा प्रत्येक घराघरात "राजा शिवाजी, राजा संभाजी" जन्माला येईल असे त्यांनी त्यांच्या व्याख्यानात नमूद केले. त्याचबरोबर सध्या समाजात वृद्धाश्रमांची संख्या वाढत आहेत, हे समाजाच्या हिताचे नाही, त्यामुळे प्रत्येक आई-वडिलांनी आपल्या मुलांवर चांगले संस्कार केले तर, त्यांना "वृद्धाश्रमात" जाण्याची वेळ कधीच येणार नाही, अशी ही बाब त्यांनी व्यक्त केली.

कै.श्री.निवृत्ती हरिभाऊ बोडके हे 'दिंडोरी तालुक्यातील आशेवाडी' गावचे रहिवासी होते, ते कल्याण येथील रेल्वे विभागात कार्यरत होते, त्यांच्या प्रथम वर्षश्राद्ध निमित्त हेंगडे पाटील यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. याप्रसंगी 'बोडके' कुटुंबाचे सर्व नातेवाईक मंडळी आणि मोठ्या संख्येने महिलावर्ग उपस्थित होता. यावेळी श्री.मधुकर बाबुराव आव्हाड, श्री.देविदास निवृत्ती बोडके, रामदास निवृत्ती बोडके, शाहीर आकाश पाटील अशी प्रमुख मंडळी यावेळी उपस्थित होती. सर्वांनी या आगळ्यावेगळ्या व्याख्यान विषयाचे कौतुक केले व या व्याख्यानाला उपस्थितांकडून चांगला प्रतिसाद मिळाला.

# भारतीय बौद्ध महासभेचे दहा दिवसीय श्रामनेर शिबिर संपन्न

पल्लवी शेलार
श्रिगोंदा तालुका प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत

पारनेर जिल्हा अहिल्यानगर येथे भारतीय बौद्ध महासभा पारनेर तालुका शाखेच्या वतीने दि.१७ मे २०२५ रोजी दहा दिवसीय श्रामनेर शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचे दि.२६ मे २०२५ रोजी केंद्रीय शिक्षक हजारे गुरुजी,भंते सुमेध बोधी (A) यांच्या उपस्थितीत समारोप पार पडला. यावेळी संघटनेच्या वतीने शिबीरार्थींना प्रशस्तीपत्र देण्यात आले. गिरीश साळवे यांच्या वतीने 'बुद्ध आणि त्यांचा धम्म ' या ग्रंथाचे वाटप करण्यात आले. या शिबिरात सतत दहा दिवस शिबिरार्थींना सेवा देणारे गोरेगावचे सुखदेव थोरात कुटूंब, सचिन नगरे कुटूंब तसेच गिरीश गायकवाड यांचे कुटूंब यांना आदर्श बौद्ध कुटूंब पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. कल्याणचे केंद्रीय शिक्षक सन्माननीय हजारे गुरुजी यांना ' संविधानाची ऊद्देशीका ' भेट देऊन मा. विरेंद्र पवार यांचे हस्ते सन्मानित करण्यात आले. भंते कडुन शिबीरार्थींचे चिवर उतरवून शिबिरा दरम्यान घेतलेले शिक्षण समाजामध्ये धम्माचा प्रसार - प्रचार कामी उपयोग करण्याची शपथ देऊन त्यावेळी अविस्मरनीय प्रवचन देण्यात आले. अखेरीस शिबिराकरिता भोजन व नाष्टा दान करणाऱ्या ऊपासकांचा भंते यांच्यामार्फत सत्कार करण्यात आला. सहभोजनाच्या कार्यक्रमाने समारोप करण्यात आला. शिबीर यशस्वीरित्या पार पाडण्याकरिता शंकरराव नगरे, बाळासाहेब नगरे, सुनिल शिंदे, किरण शिंदे सह तालुक्यातील असंख्य बौद्ध अनुयायांनी मेहनत घेतली.

PASSWORD PROTECTED PAGE